**कृपया प्रसिद्धीसाठी**

## ❖ चंदू बोर्डेनी विद्यार्थ्यांना सांगितली यशाची त्रिसूत्री.

## ❖ 'लेखक तुमच्या भेटीला' उपक्रमाचे उद्‌घाटन.

पुणे : प्रत्येक गोष्ट जर बुद्धीमत्तेचा वापर करून मनापासून व परिश्रमपूर्वक केली तर (हेड, हार्ट, हार्डवर्क) आयुष्यात यशस्वी होता येते असा यशोमंत्र भारतीय क्रिकेट संघाचे माजी कप्तान चंदु बोर्डेयांनी दिला. ते ' **लेखक तुमच्या भेटीला '** या कार्यक्रमात, रावसाहेब गोगटे प्रशालेतील विद्यार्थ्यांसमोर बोलत होते. या वेळी विख्यात साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार, शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा संगीता तिवारी, मुक्ता टिळक, रामचंद्र जाधव, शाळेचे मुख्याध्यापक शामराव कराळे, साहित्य संमेलनाचे कार्यवाह वि. भा. देशपांडे, साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. सतीश देसाई इ, उपस्थित होते.

प्रा. द. मा. मिरासदार यांनी मुलांना भुताच्या विनोदी कथा सांगितल्या. तसेच त्यांनी आपल्या बालपणाची सफर देखील घडवून आणली.

साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी **' संमेलनपूर्व संमेलन '** ही कल्पना उपस्थितांना विषद करून सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती महाळंक यांनी केले तर आभारप्रदर्शन रवी चौधरी यांनी केले.

***

अधिक माहितीसाठी संपर्क : प्रकाश पायगुडे: ९४२२०१२०२०

फोटो ओळी :

लेखक तुमच्या भेटीला या उपक्रमाचे गोगटे प्रशालेतील मुलांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी डावीकडून नगरसेविका मुक्ता टिळक, शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा संगीता तिवारी, द. मा. मिरासदार, चंदू बोर्डे, डॉ. सतीश देसाई, वि. भा. देशपांडे.